प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ मोहन रामराव तायवाडे -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा उलटतपास वादीतर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. प्रविण बी. अवचट यांक्षरे -

प्रश्न सर्वे नं. ३८ आणि ४३ मध्ये केवळराम याला हिस्सा देण्यात आला होता का ?

उत्तर केवलराम याला दुसरी शेती, वडीलांनी विकत घेवुन दिली होती.

७. माझा भाउ आणि बहिणींना, बक्षिसपत्र करण्यापुर्वी नोटीस दिली होती. सदर नोटीस मी न्यायालयात दाखल केली नाही. ज्यावेळेस बक्षिसपत्र झाले त्यावेळेस माझे वडील अंदाजे ८९-९० वर्षाचे होते. बक्षिसपत्र करतांना, वडीलांची मानसिक व शारिरीक स्थिती चांगली असल्याबाबतचे, डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्र लावले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की वडीलांची तब्यत चांगली होती त्यामुळे तसा प्रश्न आला नाही. हे म्हणणे खरे नाही की वडीलांची मानसिक स्थिती त्यावेळेस चांगली नसल्याचा गैरफायदा घेवुन, बक्षिसपत्र करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की इतर भावा बहिणींना माहिती न देत बक्षिसपत्र केले. माझे वडील धान्य खरेदी-विक्री करत असल्याचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही. खंडाळा येथील घर माझ्या वडीलांनी स्वतःमिळकतीतुन विकत घेतल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. बहिणींना कायकाय देण्यात आलेले आहे याबाबतचा लेखी पुरावा मी दाखल केलेला नाही. वादी आणि वादीचा मुलगा माझ्या घरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस वादींनी वाटणीची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस मी बक्षिसपत्राची माहिती त्यांना दिली आणि धमकावले की, तुम्हाला जे करायचे आहे ते करा. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस वादीने माझ्याविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की दहा दिवसानंतर वादी घरी आले होते, त्यावेळेस वडीलांनी त्यांना सांगितले की त्यांनी कोणताही दस्त केला नाही आणि जे तुमचे आहे ते तुम्हाला मिळेल. हे म्हणणे खरे नाही की सर्वे नं.२१ आणि २२ हे माझे आजोबा सदाशिव यांनी त्यांच्या हयातीमध्ये सन १९५८ साली करार करुन विकत घेतले होते आणि त्याचे खरेदीपत्र दोन भाउ हरिभाउ आणि रामराव यांचे नावे, सदाशिव मयत झाल्यामुळे, आजीने करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ ची सही लेखी कैफियतीमध्ये मी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की लेखी कैफियत ही माझ्या वडीलांची नसुन, ते म्हणणे आहे. हे म्हणणे खरे नाही की खंडाळातील घर आजोबाचे वडील गणेशा तायवाडे यांनी घेतले

आहे. हे म्हणणे खरे नाही की सर्व दावा मिळकत ही वडीलोपार्जित आहे आणि त्यावर सर्वाचा समान हक्क आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.02.27 11:18:18 +0530

दिनांक २६.०२.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)